# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक २७/०३/२०२५ ( गुरूवार ) संध्याकाळ

---

## मोटर पंप व केबल चोरीचे ६ गुन्हे उघड, ३ आरोपीतांना अटक, नरखेड पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन नरखेड** :— नरखेड पोलीस त्यांच्या कडे तपासावरील असलेल्या मोटर पंप चोरी आणि केबल चोरी चे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी तपास करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्यावरून तीन आरोपींबाबत माहीती प्राप्त झाली. त्यावरून पोलीसांनी आरोपी नामे १. गौतम नामदेव बागडे, वय ३२ वर्षे,रा गणेशपुर ता वरूड जि अमरावती. २.रंचु बादल धुर्वे,वय ५४ वर्षे,रा. मोहदी धोत्रा,ता नरखेड जि. नागपुर ३. शिशुपाल रिमेश शेंडे, वय ३४ वर्षे,रा एकलविहार ता. वरूड, जि. अमरावती या तीन आरोपीतांना ताब्यात घेतले आणि त्याची विचारपुस केली असता त्यांनी मिळुन पोलीस स्टेशन नरखेड हद्दीत चोरीचे आणि घरफोडीचे गुन्हे केल्याची माहीती दिली. **पोलीसांनी नमुद आरोपीतांना अटक केली असुन त्यांच्या ताब्यातुन ७ वेगवेगळया कंपनीच्या पाणबुडी मोटर पंप ,१०० फुट केबल, इतर साहीत्य किंमती ५४,०००/— रूपये आणि गुन्हयात वापरलेली मोटर सायकल पॅशन प्रो क्रमांक एम. एच ४० ए. एफ. ३६५४ किंमती ५०,०००/— रूपये असा एकुण किंमती १०४,००० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**उघडकीस आलेले गुन्हे—**

१) पोलीस ठाणे नरखेड गुन्हे रजि.नं. ०४/२५ कलम ३०३(२),३(५) भा.न्या.स.

२) पोलीस ठाणे नरखेड गुन्हे रजि.नं. १९/२५ कलम ३३१(३),३३१(४),३०५(अ)भा.न्या.स.

३) पोलीस ठाणे नरखेड गुन्हे रजि.नं. २०/२५ कलम ३०३(२),३(५) भा.न्या.स.

४) पोलीस ठाणे नरखेड गुन्हे रजि.नं. २८/२५ कलम ३०३(२),३(५) भा.न्या.स.

५) पोलीस ठाणे नरखेड गुन्हे रजि.नं. १०३/२५ कलम ३०३(२),३(५) भा.न्या.स.

६) पोलीस ठाणे नरखेड गुन्हे रजि.नं. २४६/२५ कलम ३०३(२),३(५) भा.न्या.स.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर